**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.विजयराव ज्ञानेश्वर दाभाडे
यशवंतनगर, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण,
पाषाण, ता.हवेली, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधीक्षक,
देहूरोड उपविभाग, देहूरोड, जुना काकडे नाका, जुना पुणे-मुंबई रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४९+२३५१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधीक्षक,
देहूरोड उपविभाग, देहूरोड, जुना काकडे नाका, जुना पुणे-मुंबई रोड, पुणे श्री.एस.डी.कोकाटे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७.५.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.१.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.७.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.८.८.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता ॲड.विजयराव ज्ञानेश्वर दाभाडे यांनी मागितलेली माहिती देण्यात आली आहे. माहिती ज्यांच्याकडे होती, असे संबंधित कर्मचारी अचानक आजारपणाच्या रजेवर गेल्यामुळे उत्तर देण्यास चार दिवस विलंब झाला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधीक्षक, देहूरोड उपविभाग, देहूरोड, जुना काकडे नाका, जुना पुणे-मुंबई रोड, पुणे श्री.एस.डी.कोकाटे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ.विक्रम घावटे
किलबिल चिल्ड्रन्स हॉस्पिटल, कॉलेज रोड, शिरूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, शिरूर नगरपरिषद,
घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ओव्हरसियर, शिरूर नगरपरिषद,
घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३६२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, शिरूर नगरपरिषद,
घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे श्री.पां.मा.मसलेकर

**जन माहिती अधिकारी** तथा ओव्हरसियर, शिरूर नगरपरिषद,
घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे श्री.रा.गो.वाघमारे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.३.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.४.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२६.५.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२१.६.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ओव्हरसियर, शिरूर नगरपरिषद, घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे यांनी विलंबाने व अपूर्ण दिली. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, शिरूर नगरपरिषद, घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे यांनी अपील अंशतः मान्य केले. माहितीसाठी टपाल खर्च २५ रूपये घेतला, परंतु माहिती समक्ष स्वीकारल्यामुळे हा आपल्याला भुर्दंड असल्याचेही अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, शिरूर नगरपरिषद, घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे यांनी मान्य केले. तसेच जन माहिती अधिकारी तथा ओव्हरसियर, शिरूर नगरपरिषद, घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे यांनी माहिती विलंबाने व काही मुद्दयांमध्ये विसंगत दिल्याचे नमूद करूनही जन माहिती अधिकारी तथा ओव्हरसियर, शिरूर नगरपरिषद, घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे यांच्यावर दंडात्मक कारवाई केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता डॉ.विक्रम घावटे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात, निवेदनात व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केली आहे.

अपीलकर्त्यास पूर्ण माहिती देण्यात आली आहे. गटारीचे काम तीन वर्षात तीन वेळा केल्याचे डॉ.घावटे यांनी म्हटले आहे. परंतु तीन टप्प्यात काम केल्यामुळे ती वेळा काम झाले, असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ओव्हरसियर, शिरूर नगरपरिषद, घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे श्री.रा.गो.वाघमारे यांनी केले.

माहिती तयार असल्याचे डॉ.घावटे यांना दूरध्वनीवरून कळविले. दरम्यान त्यांनी टपालाचे पैसे भरले होते व माहिती आपला प्रतिनिधी समक्ष येऊन स्वीकारेल, असे सांगितले होते. त्यानुसार त्यांच्या प्रतिनिधीकडे माहिती दिली, असे श्री.रा.गो.वाघमारे यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

डॉ.घावटे यांना मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली. प्रथम अपिलाच्या अर्जात त्यांनी अनुषंगिक मुद्दे उपस्थित करून खुलासेवजा अतिरिक्त माहिती मागितली व त्याच अनुषंगाने अपिलातील निर्णय देण्यात आला आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, शिरूर नगरपरिषद, घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे श्री.पां.मा.मसलेकर यांनी नमूद केले.

मूळ अर्जानुसार अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने स्पष्टीकरणात्मक मुद्दे व अतिरिक्त माहिती यांची प्रथम अपिलात मागणी करणे, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये योग्य नाही. मात्र टपाल खर्चापोटी घेतलेले शुल्क रू.२५ जन माहिती अधिकारी तथा ओव्हरसियर, शिरूर नगरपरिषद, घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे यांनी स्वखर्चातून डॉ.घावटे यांना परत करावेत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात आहे.

(२) शुल्क परत करण्याबाबत आयोगाने दि.३०.३.२०१० रोजी केलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा ओव्हरसियर, शिरूर नगरपरिषद, घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे यांनी आयोगाला दि.५.६.२०१० पर्यंत सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
20 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नामदेव बाबासाहेब खरात
नितीराज निवास, निरा, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
दहिवडी विभाग, कॅम्प वडुज, ता.खटाव, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन म्हसवड, ता.माण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३८२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नामदेव बाबासाहेब खरात
नितीराज निवास, निरा, ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
दहिवडी विभाग, कॅम्प वडुज, ता.खटाव, जि.सातारा श्री.एम.जी.सपकाळ

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन म्हसवड, ता.माण, जि.सातारा श्री.ए.आर.देवकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.७.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.९.८.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या मागणीनुसार पूर्ण माहिती दिली नाही. अंगणवाडी शिक्षिका निवडीबाबत भ्रष्टाचार झाला असून त्या संदर्भातील अर्जाच्या व पत्रव्यवहाराच्या प्रती मिळाल्या नाहीत. त्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक, पालीस स्टेशन म्हसवड, ता.माण, जि.सातारा यांना शास्ती करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.नामदेव बाबासाहेब खरात यांनी केली.

श्री.खरात यांचा अर्ज दि.१०.७.२००८ रोजी प्राप्त झाला. दि.७.८.२००८ रोजी त्यांना माहिती देण्यात आली. कळविलेले शुल्क भरले नसतानाही अतिरिक्त माहिती त्यांना नंतर पाठविली. त्यांच्या मूळ अर्जात पहिल्या दोन मुद्दयात विशिष्ट कागदपत्रांची मागणी केलेली नाही, तरीही कागदपत्रांच्या छायांकित प्रती दिल्या आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक, पालीस स्टेशन म्हसवड, ता.माण, जि.सातारा श्री.ए.आर.देवकर यांनी केले.

श्री.खरात यांना उपलब्ध माहिती देण्यात आली आहे. प्रथम अपील त्यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन म्हसवड, ता.माण, जि.सातारा यांच्याकडेच केले होते. विशिष्ट कागदपत्रांची मागणी केल्यास त्वरित देता येईल. मात्र आपल्या मुलीच्या निवडीच्या अनुषंगाने भ्रष्टाचार व अन्याय झाल्याची त्यांची तक्रार असून त्याबाबतच्या प्रशासकीय कार्यवाहीची त्यांची मागणी आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, दहिवडी विभाग, कॅम्प वडूज, ता.खटाव, जि.सातारा श्री.एम.जी.सपकाळ यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. प्रशासकीय कार्यवाहीची त्यांची मागणी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. संबंधित संचिकेतील मूळ अर्जात स्पष्टपणे नमूद नसलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना हव्या असल्यास निःशुल्क द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार त्याचदिवशी त्यांनी मागितलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना देऊन घेतलेली पोहोच अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, दहिवडी विभाग, कॅम्प वडूज, ता.खटाव, जि.सातारा यांनी आयोगाला सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सॅमसन बेंजामिन
लंकेश्वर, नमो दर्शन अपार्टमेंट, फ्लॅट नं.१, स.नं.५१,
प्लॉट नं.८८, भैरवनगर, धानोरी, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहधर्मादाय आयुक्त,
धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले-पाटील रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले-पाटील रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४६३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय,
ढोले-पाटील रोड, पुणे श्री.चं.आ.पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.४.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.९.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२४.६.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हजर न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.सॅमसन बेंजामिन यानी मागितलेली व धर्मादाय आयुक्त कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले-पाटील रोड, पुणे श्री.चं.आ.पाटील यांनी संबंधित उत्तराच्या प्रतींसह केले.

अपीलकर्त्यांनी न्यासाची माहिती मागितली असून कायदेशीर बाबींची पूर्तता संबंधित न्यायासनाकडून झाली नसल्याची तक्रार अपीलकर्त्याच्या माहिती मागणी अर्जात दिसून येते, ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात आहे.

(२) न्यासाकडून उपलब्ध होईल त्यानुसार माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले-पाटील रोड, पुणे यांनी उत्तरात नमूद केले आहे. याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले-पाटील रोड, पुणे यांनी ५.६.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
20 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. नामदेव बाबासाहेब खरात
रा.नितीराज निवास, मु.पो निरा, **अपीलकर्ता**
ता.पुरंदर, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,**
नगर रचनाकार, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक,**
नगररचना, २८३, नारायण पेठ,
पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९२/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७/०७/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४/०८/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५/०८/२००८ |
| ५ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नामदेव बाबासाहेब खरात यांचे प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता श्री. खरात यांनी मागितलेल्या माहितीची स्पष्टता होत नाही. तसेच आपल्याला आवश्यक माहितीच्या अनुषंगाने अभिलेखाचे निरीक्षण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार करुन, माहितीची स्पष्ट मागणी केल्यास व आवश्यक शुल्क भरल्यास माहिती पुरविण्यात

येईल, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना, पुणे शाखा यांनी विहित मुदतीत कळविले आहे. ते रास्त आहे. त्यानुसार आवश्यक तर अपीलकर्त्यांने अभिलेखाचे निरिक्षण करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. अनंत देऊ गावडे
स.नं.३६/२, विद्यानगर लेन नं.६, वल्ड वॉटर टँक,
पुणे-४११ ०१५ .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कार्यकारी
दंडाधिकारी, हवेली, जि. पुणे .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब
तहसीलदार, हवेली, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५२६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १५.४.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. अनंत देऊ गावडे<br>स.नं.३६/२, विद्यानगर लेन नं.६, वल्ड वॉटर टँक,<br>पुणे-४११ ०१५ | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.९.२००८ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ व २४.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १५.४.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपील निकाली काढण्याबाबत एकमताने ठरल्याचे अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. तथापि माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्त्याने नंतर केल्यामुळे अपील सुनावणीस घेण्यात आले. जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याला माहिती व अर्जाला उत्तर दिले नसल्याचे श्री. गावडे यांनी सांगितले. मात्र सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता 'माहिती तयार असून शुल्क भरुन प्राप्त करून घेता येईल,' असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, जि. पुणे यांनी विहित मुदतीत कळविले आहे. त्यानुसार माहिती आवश्यक असल्यास अपीलकर्त्याने शुल्क भरून प्राप्त करून घ्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिलकुमार बावधनकर
चोपडे एजन्सीज अँड कन्सल्टसीज,
हिरामण लांडे बिल्डिंग, मुंबई-पुणे रोड,
कासारवाडी, पुणे-३४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय फलटण,
ता.फलटण, जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
फलटण तहसील कार्यालय,
ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५३४/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१/०५/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**<br>फलटण तहसील कार्यालय,<br>ता.फलटण, जि.सातारा<br>श्री. संभाजी मल्हारी हेरवाडे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**<br>तहसील कार्यालय फलटण,<br>ता.फलटण, जि.सातारा<br>श्री. सतिश बागल | |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२/०५/२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २/०७/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** फलटण तालुक्यातील सरकार मान्य रेशन व रॉकेल दुकानदारांचा पत्यासह तपशील व श्री. नंदकुमार शहा आणि दत्तात्रय अणपट या रॉकेल विक्रेत्यांना १९९० ते २००७ या कालावधीत वितरित करण्यात आलेले रॉकेल | |

## विवेचन

संदभीय अपिलाबाबतची माहिती आपल्याला दि.२२/०९/२००८ रोजी प्राप्त झाली असून सदरचे अपील निकाली काढण्यात यावे, असे अपीलकर्ता श्री. सुनिलकुमार बावधनकर योंच दि.१९/०५/२०१० रोजीचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण तहसील कार्यालय, व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय फलटण, यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश देवराम टाकळकर
मु.पो.पिंपळे जगताप, ता.शिरूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, ग्रामीण पोलीस
अधीक्षक कार्यालय, चव्हाणनगर, पाषाण, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, दौंड,
ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५३६+२५३७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश देवराम टाकळकर
मु.पो.पिंपळे जगताप, ता.शिरूर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, दौंड,
ता.दौंड, जि.पुणे श्री.शंकर हनुमंत केंगार

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.४.२००८ व २६.४.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१२.५.२००८ व १२.५.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१५.७.२००८ व ८.७.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

नागरिकांच्या कोणकोणत्या कामासाठी किती शुल्क आकारले जाते, याबाबतच्या दरपत्रकाची मागणी आपण केली होती. परंतु ती अपुरी दिली. सभा-संमेलने, मिरवणूक, भोंगे लावणे यांच्या परवानगीचे शुल्कही कळविणे आवश्यक आहे, अशी मागणी अपीलकर्ता श्री.रमेश देवराम टाकळकर यांनी केली.

अपीलकर्त्याच्या मूळ अर्जानुसार अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली. 'रिलायन्सच्या विरोधातील अर्जाबाबत पोलीस खाते संबंधित शेतकऱ्यांवर दबाव आणते याबाबतची माहिती द्यावी,' अशा स्वरूपाची मागणी आहे. संबंधित अर्जदारानी तक्रार नसल्याचे कळविले असून ती माहितीही अपीलकर्त्यास दिली, असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, दौंड, ता.दौंड, जि.पुणे श्री.शंकर हुनमंत केंगार यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

विविध प्रकारच्या परवान्यांसाठी / कामासाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्काचा तपशील शिक्रापूर पोलीस ठाण्यात फलकाद्वारे जाहीर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, दौंड, ता.दौंड, जि.पुणे यांनी दि.२५.६.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. आशिष अशोक वेखंड
१९-बी, गजानन, बी सोसायटी,
परमहंसनगर, गल्ली नं.४, १४, वनाज,कोथरूड,
पुणे-४११ ०३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
वर्धा पाटबंधारे विभाग, जि. वर्धा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १७.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता -** श्री. आशिष अशोक वेखंड<br>१९-बी, गजानन, बी सोसायटी, परमहंसनगर,<br>गल्ली नं.४, १४, वनाज, कोथरूड, पुणे-४११ ०३८<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,<br>चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपूर तर्फे प्रतिनिधी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>वर्धा पाटबंधारे विभाग, जि. वर्धा श्री. अरविंद कुमार दत्त | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.१.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.१.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि.२६.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १७.४.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

वैद्यकीय देयकाच्या मंजुरीला झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभाग, जि. वर्धा यांनी दिलेली कारणे चुकीची असून माहिती अपुरी आहे. माहिती देण्यास विलंब झालेला असतानाही शुल्क आकारले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. आशिष अशोक वेखंड यांनी केली. संबंधित वैद्यकीय देयक अधीक्षक अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपूर यांच्याकडे १३ महिने प्रलंबित होते, त्यामुळे ते देण्यास विलंब झाला. उपलब्ध सर्व माहिती प्राप्त करून दिली, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभाग, जि. वर्धा श्री. प्रकाश दामोदर हुंडे यांनी सांगितले. तथापि देयक १३ महिने का प्रलंबित होते, हे स्पष्ट झालेले नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. आशिष अशोक वेखंड यांनी केली.

अपीलकर्त्याने अनेक मुद्दयांवर खुलासा, स्पष्टीकरण अशा स्वरूपाची मागणी केली असून अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती'च्या व्याख्येत बसत नाही. मात्र अधीक्षक अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपूर यांच्याकडे संबंधिक देयक १३ महिने का प्रलंबित होते, याची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. संबंधित अधिका-यांकडून ती प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास द्यावी, तसेच मूळ अर्जानुसार माहिती देण्यास विलंब झालेला असताना माहितीसाठी शुल्क आकारणे योग्य नाही. माहिती नि:शुल्क देणे आवश्यक होते. सन २००१ ते २००४ या कालावधीतील व संकलित करून देणे आवश्यक असलेली माहिती असल्याचे लक्षात घेता विलंब क्षमापित करण्यात यावा, अशी विनंती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभाग यांनी केली. ती मान्य करण्यात येत आहे, मात्र आकारलेले शुल्क

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभाग, जि. वर्धा श्री. प्रकाश दामोदर हुंडे यांनी अपीलकर्त्यास व्याजासह परत करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. प्रकाश दामोदर हुंडे व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. अरविंद कुमार दत्त यांनी दि. २०.६.२०१० पर्यंत आयोगास सादर न केल्यास ते कारवाईस पात्र ठरतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश निवृत्ती कांबळे
५४, बी.पी.४४१, लोहियानगर, गंजपेठ, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीजजवळ, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीजजवळ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५६१+२७३८+२७३९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश निवृत्ती कांबळे
५४, बी.पी.४४१, लोहियानगर, गंजपेठ, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीजजवळ, पुणे श्री.चंद्रकांत खरटमल

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीजजवळ, पुणे श्री.अमर पाटील

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| २५६१ | १५.४.२००८ | १३.५.२००८ | १६.५.२००८ | २.९.२००८ |
| २७३८ | २५.८.२००८ | १३.१०.२००९ | १.१०.२००८ | -- |
| २७३९ | २४.१०.२००८ | १७.११.२००८ | २१.११.२००८ | १२.१.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | | | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अ.क्र.२७३८ व २७३९ / पुणे या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१७.४.२०१० रोजी घेण्यात आली.

केंद्रिय मोटार वाहन कायद्यानुसार मंजुरीसाठी आलेल्या वाहनांबाबत संबंधित वाहन उत्पादकांनी पूर्तता केली आहे काय? परिवहन अधिकाऱ्यांनी त्याबातची पूर्तता केल्याची तपासणी करणे आवश्यक असून त्याबाबतच्या कागदपत्रांशिवाय मान्यता कशी दिली, हे स्पष्ट होत नाही. त्याबाबत वारंवार मागणी केली असता दिशाभूल करणारी माहिती दिली जात आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रमेश निवृत्ती कांबळे यांनी केली.

श्री.कांबळे याच विषयाबाबत माहितीच्या अधिकारातील अर्जांबरोबरच अन्य अर्ज व पत्रव्यवहार सातत्याने करीत आले आहेत. सन १९९६ ते २००० या काळातील ही माहिती असून संबंधित मान्यतेच्या प्रती कार्यालयात उपलब्ध नाहीत. संबंधित उत्पादक टाटा मोटर्स यांच्याकडे त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. सन १९९७ च्या परिपत्रकान्वये गाड्यांची नोंद करण्यात आली आहे. ही सर्व माहिती श्री.कांबळे यांना देण्यात आली असून सर्व संचिकांचे अवलोकन त्यांनी केले आहे. आवश्यक पूर्ततेशिवाय गाड्यांची नोंद नियमबाह्य असल्याची त्यांची

तक्रार असून त्या अनुषंगाने त्यांची मागणी प्रामुख्याने प्रशासकीय कार्यवाहीची आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज, पुणे श्री.अमर पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज, पुणे श्री.चंद्रकांत खरटमल यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज, पुणे यांनी अपीलकर्त्यास अभिलेखांनुसार माहिती दिली आहे. अपीलकर्त्यांनी सर्व संचिकांचे अवलोकनही केलेले आहे. मूळ प्रकरणी नियमबाह्य कार्यवाही झाली असल्याची अपीलकर्त्यांची तक्रार असून त्याचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विश्वास गुलाबराव सणस
१३८, शुक्रवार पेठ, शिंदे आळी, पुणे-२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, भोर
ता. भोर, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,भोर
तहसील कार्यालय, भोर, ता. भोर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५८२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १५.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. विश्वास गुलाबराव सणस<br>१३८, शुक्रवार पेठ, शिंदे आळी, पुणे-२<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, भोर<br>ता. भोर, जि. पुणे श्री. सचिन इथापे<br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,भोर<br>तहसील कार्यालय, भोर, ता. भोर, जि. पुणे श्री. डी. एन. रेडके | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.१०.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि.१५.४.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

वारस हक्काची नोंद दुरूस्त करून संबंधित व्यक्तीच्या नावे सात-बारा व आठ-अ उतारा देण्याची मागणी आपण जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, भोर यांच्याकडे केली होती. परंतु तशा नकला व त्याबाबतच्या आपल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली नाही, प्रथम अपिलाच्या निर्णयाची प्रत मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. विश्वास गुलाबराव सणस यांनी केली.

आठ-अ उताऱ्याला चुकीची नोंद झाल्याची तक्रार व ती दुरूस्त करण्याची मागणी अपीलकर्ता श्री. सणस यांनी दि. २२.४.२००८ च्या पत्रान्वये केली होती. त्याबाबत चौकशी करण्याविषयी मंडल अधिकाऱ्यांना कळविले. माहिती टपालाने विहित मुदतीत पाठविली, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, भोर श्री. डी. एन. रेडके यांनी नमूद केले. श्री. सणस यांची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. कार्यवाही पूर्ण करून त्यानुसार उतारा द्यावा, अशी मागणी त्यांनी 'माहिती' म्हणून केली आहे. संबंधित प्रशासकीय कार्यवाही पूर्ण झाल्याशिवाय ७/१२ उताऱ्यावरील नोंदीत बदल होऊ शकत नाही. त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसतानाही प्रशासकीय कार्यवाही सुरु करुन तसे त्यांना कळविले आहे. वारस नोंदी संदर्भात त्यांनी तद्विषयक नियमावलीनुसार अपील केल्यानंतर त्याबाबतचा निर्णय होऊ शकेल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, भोर श्री. सचिन इथापे यांनी केले.

वारस हक्क नोंद दुरूस्त करण्याची मागणी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निकालपत्रासाठी स्वतंत्र अर्ज अपीलकर्त्याने करणे आवश्यक नाही. संबंधित अपीलकर्त्यास निकालपत्राच्या प्रती पाठविल्या गेल्या पाहिजेत, याची समज अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, भोर श्री. सचिन इथापे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
दि. 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.कमल सोमा शेळकंदे
ओमशक्तीनगर, शिवनेरी पायथा, मु.बारथ, ता.जुन्नर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
जुन्नर नगरपरिषद, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
जुन्नर नगरपरिषद, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५८३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ.कमल सोमा शेळकंदे
ओमशक्तीनगर, शिवनेरी पायथा, मु.बारथ, ता.जुन्नर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
जुन्नर नगरपरिषद, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे प्रतिनिधी श्री.ए.एस.लांडे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
जुन्नर नगरपरिषद, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.ए.एस.लांडे
श्री.भि.दा.बोऱ्हाडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.५.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.५.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.६.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.६.८.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

सेवाज्येष्ठता यादीतील आपले नाव काढून टाकण्यात आले असून नगरपालिका शिक्षण मंडळाने आपल्यावर अन्याय केला आहे. तो दूर करावा, अशी मागणी अपीलकर्त्या सौ.कमल सोमा शेळकंदे यांनी केली. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, जुन्नर नगरपरिषद, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे यांनी सेवाज्येष्ठता यादीबाबत केलेली कार्यवाही चुकीची असून दिलेली माहितीही चुकीची आहे, असही प्रतिपादन सौ.शेळकंदे यांनी केले.

सौ.शेळकंदे यांनी मागितलेली सर्व माहिती त्यांना दिली आहे. प्रथम अपिलाच्या निकालानंतर मूळ अर्जात नसलेल्या आणखी काही कागदपत्रांची मागणी व काही मुद्दयांबाबत खुलाशाची विचारणा त्यांनी केली. त्याचीही पूर्तता करण्यात आली. सेवाज्येष्ठता यादीतील क्रमाबाबत स्पष्टीकरणासह सर्व तपशील त्यांना दिला असून दि.११.१.२००५ रोजी प्रसिध्द केलेली सेवाज्येष्ठता यादी योग्य आहे. सर्व माहिती मिळाली असल्याचे सौ.शेळकंदे यांनी लेखी दिलेले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, जुन्नर नगरपरिषद, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.ए.एस.लांडे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता माहिती अपीलकर्त्यास देण्यात आलेली आहे. सेवाज्येष्ठता यादीबाबत स्पष्टीकरणही जन माहिती

अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, जुन्नर नगरपरिषद, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे यांनी दिले आहे. यादी चुकीची की बरोबर व अपीलकर्त्यावर अन्याय झाला आहे का, हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विनायक कुंडलिक माने
रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, दौंड,
ता. दौंड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
दौंड नगरपरिषद, ता. दौंड, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
दौंड नगरपरिषद, ता. दौंड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५९८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १५.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विनायक कुंडलिक माने
रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, दौंड,
ता. दौंड, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
दौंड नगरपरिषद, ता. दौंड, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
दौंड नगरपरिषद, ता. दौंड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.१०.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १५.४.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

सन १९९२ ते २००८ या काळातील बेकायदेशीर बांधकामाच्या संदर्भात मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, दौंड नगरपरिषद, ता. दौंड, जि. पुणे यांनी अपुरी दिली, तसेच संबंधित इमारतीच्या वापर प्रमाणपत्रांच्या प्रती दिल्या नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. विनायक कुंडलिक माने यांनी केली.

अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत व सरसकट स्वरूपातील आहे. सर्व माहिती त्यांना संकलित करून देण्यात आली. माहितीच्या विस्तृत स्वरुपामुळे विलंब लागेल, असे त्यांना कळविले होते. नंतरच्या अपिलामध्ये त्यांनी कारणांची विचारणा व कार्यवाहीबाबत तक्रार केली. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ती नसल्यामुळे देता येणार नाही हे त्यांना कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, दौंड नगरपरिषद श्री. जे. पी. दिवेकर व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, दौंड नगर परिषद श्री. वि. रा. वालगुडे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्त्यांची माहितीची मागणी दिर्घ कालखंडातील व अत्यंत विस्तृत स्वरूपाची आहे. दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नसल्यास संबंधित संचिकेचे अवलोकन त्यांना करू द्यावे व त्यातील त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांची मागणी लेखी स्वरूपात केल्यानंतर योग्य ते शुल्क आकारून प्रती द्याव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विश्वनाथ किसन म्हाळसकर
म्हाळसकरवाडी, डेक्कन पोल्ट्री फार्मच्या मागे,
वडगाव मावळ, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मावळ,
मावळ तहसील कार्यालय, ता.मावळ, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ,
मावळ तहसील कार्यालय, ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६०० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मावळ,
मावळ तहसील कार्यालय, ता.मावळ, जि.पुणे श्री.सचिन बारवकर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ,
मावळ तहसील कार्यालय, ता.मावळ, जि.पुणे श्री.राजेश चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.८.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२५.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.४.१०.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

श्रीमती अरुणा सुरचंद कुदळे यांनी खरेदी केलेल्या जमीनीच्या खरेदी दस्ताची नकल मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.विश्वनाथ किसन म्हाळसकर यांनी माहितीच्या अधिकारात केली होती. हे दस्त दुय्यम निबंधक, वडगाव मावळ या कार्यालयाकडील असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे वर्ग करुन तसे श्री.म्हाळसकर यांना कळविले. प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या निर्णयातही तसे नमूद केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.राजेश चव्हाण यांनी केले. त्यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 MAY 2010

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. नामदेव शामराव नालंदे
व्हील कॉलनी,
बारामती, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन,
मंगळवार पेठ, पुणे-११

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
पुणे पाटबंधारे विभाग, गोळीबार मैदानाजवळ,
शंकरशेठ रोड, कॅम्प, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६२९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१/०५/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**अपीलकर्ता**<br>श्री. नामदेव शामराव नालंदे<br>व्हील कॉलनी, बारामती, जि.पुणे<br>**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**<br>पुणे पाटबंधारे विभाग, गोळीबार मैदानाजवळ,<br>शंकरशेठ रोड, कॅम्प, पुणे-१<br>श्री.सं.द.चोपडे<br>**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**<br>पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन,<br>मंगळवार पेठ, पुणे-११<br>श्री.अ.वा.सुर्वे | |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७/०४/२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११/०४/२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९/०६/२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २/०७/२००८ |
| ८ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** निरा डावा कालवा वितरिका क्र.२२ मधील अस्तरीकरणाच्या कामासाठी केलेला सिमेंटचा वापर, बिल वसूली, मोजमाप, अंतिम देयक इ. बाबतची माहिती | |

**विवेचन**

'मला पूर्ण माहिती मिळालेली आहे, त्यामुळे माझे अपील निकाली काढून दप्तरी दाखल करावे,' असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री. नामदेव शामराव नालंदे यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 MAY 2010

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ.